पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## भंडारदरा पाणलोटात पावसाचा जोर वाढला

### धरणांत नव्या पाण्याची आवक


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या भंडारदरा पाणलोट क्षेत्रात अखेर पावसाने दमदार हजेरी लावली असून शेतकरी आणि धरण लाभक्षेत्रातील नागरिकांसाठी ही मोठी दिलासादायक बातमी ठरली आहे. सोमवारपासून सुरू झालेल्या संततधार पावसामुळे भातशेतीला नवसंजीवनी मिळाली असून भंडारदरा व निळवंडे धरणांमध्ये नव्या पाण्याची आवक सुरू झाली आहे. यामुळे उत्तर नगर जिल्ह्याची जीवनवाहिनी मानली जाणारी प्रवरा नदीही पुन्हा प्रवाही झाली आहे.

यंदा मान्सूनने उशिरा हजेरी लावल्यामुळे भंडारदरा पाणलोटातील आदिवासी व डोंगरपट्ट्यातील शेतकरी चिंतेत होते. अनेक ठिकाणी पेरणी झाल्यानंतर पावसाअभावी रोपे सुकण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे भात रोपांची वाढ वेगाने होण्यास मदत होणार असून खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

भंडारदरा परिसरातील डोंगर-दऱ्यांमधून झरे आणि ओढे वाहू लागल्याने निसर्ग सौंदर्य खुलले आहे. सर्वदूर निर्माण झालेल्या गारव्यामुळे वातावरणही प्रसन्न झाले आहे. विशेष म्हणजे यंदा जिल्ह्यातील अनेक भागांत पाऊस सुरू असताना भंडारदरा पाणलोट क्षेत्र मात्र कोरडे राहिले होते. त्यामुळे धरणांच्या पाणीसाठ्याबाबत चिंता व्यक्त होत होती. आता मात्र या भागातही पावसाचा जोर वाढल्याने धरण भरण्याच्या आशा बळावल्या आहेत. सध्या भंडारदरा धरणात २३५९ दलघफूट तर निळवंडे धरणात १५६२ दलघफूट इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. पावसाचा हा जोर कायम राहिल्यास दोन्ही धरणांतील साठ्यात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचा थेट फायदा शेती, पिण्याचे पाणी आणि सिंचन व्यवस्थेला होणार आहे.

भंडारदरा आणि निळवंडे धरणांवर अवलंबून असलेल्या अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर तसेच परिसरातील लाखो नागरिकांसाठी ही पावसाची सुरुवात आश्वासक मानली जात आहे. आगामी काळात पावसाची संततधार कायम राहिल्यास केवळ खरीप हंगामालाच नव्हे तर वर्षभराच्या पाणी नियोजनालाही मोठा आधार मिळणार आहे.

## लोकसभा अध्यक्षांकडून ठाकरे सेनेला बाजू मांडण्यासाठी निमंत्रण

मुंबई (वृत्तसंस्था)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'ने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला लोकसभा स्तरावर मोठा धक्का दिला आहे. ९ पैकी ६ खासदारांनी थेट सत्ताधारी गटात प्रवेश केल्यामुळे संसदेत तांत्रिकदृष्ट्या कोंडी झालेल्या ठाकरे गटाला आता लोकसभा अध्यक्षांनी आपली बाजू मांडण्यासाठी पाचारण केले आहे. तुमची काय बाजू आहे, ती आजच समोर येऊन स्पष्ट करा, असा महत्वपूर्ण निरोप लोकसभा अध्यक्षांकडून देण्यात आला आहे. या अत्यंत संवेदनशील कायदेशीर लढाईसाठी ठाकरे गटाचे मुख्य नेते दिल्लीत पोहोचले आहेत.



पक्षांतर बंदी कायद्यानुसार होणारी अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी बंडखोर गटाने २/३ (दोन तृतीयांश) बहुमताचा आकडा गाठला आहे. त्यानंतर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला आपली बाजू मांडण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी बोलावले आहे. या पार्श्वभूमीवर आज, २४ जून रोजी सायंकाळी ठीक ५:०० वाजता शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार अरविंद सावंत आणि खासदार अनिल देसाई हे लोकसभा अध्यक्षांची प्रत्यक्ष भेट घेणार असून, पक्षाचे म्हणणे त्यांच्यासमोर मांडणार आहेत.

बंडखोर ६ खासदारांच्या गटाला स्वतंत्र संसदीय गट म्हणून मान्यता दिली जाऊ नये, अशी अधिकृत विनंती यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे केली जाईल. तसेच पक्षाच्या व्हिपचे उल्लंघन केल्याप्रकरणी या खासदारांवर अपात्रतेची टांगती तलवार कशी आहे, यावर कायदेशीर युक्तिवाद केला जाणार आहे. विधानसभेतील ऐतिहासिक फुटीनंतर आता लोकसभेतही उद्धव ठाकरे यांना ६ खासदारांनी सोडल्यामुळे हा पक्षासाठी मोठा कायदेशीर आणि राजकीय पेच मानला जात आहे.

लोकसभा अध्यक्षांसोबतच्या या बैठकीत ठाकरे गटाचे नेते संसदेतील आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यात यशस्वी होतात का? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## मोदी मंत्रिमंडळात फेरबदलाचे वारे

### अनेकांना डच्चू, नव्या चेहऱ्यांना संधी?

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारमध्ये लवकरच मोठा मंत्रिमंडळ फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर या चर्चांना अधिक जोर आला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून, आगामी संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वीच मंत्रिमंडळात व्यापक बदल होण्याचे संकेत मिळत आहेत.

जॉर्ज कुरियन यांचा राज्यसभेचा कार्यकाळ २१ जून रोजी संपुष्टात आला. भाजपने त्यांना पुन्हा राज्यसभेवर संधी न दिल्याने त्यांचे मंत्रिपद कायम ठेवणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांचा राजीनामा अपेक्षित मानला जात होता. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. अधिकृतरीत्या ही सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात आले असले, तरी सूत्रांच्या माहितीनुसार संभाव्य मंत्रिमंडळ फेरबदलावरही यावेळी चर्चा झाल्याचे समजते.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांचाही राज्यसभा कार्यकाळ संपला असून त्यांनाही भाजपने पुन्हा संधी दिलेली नाही. त्यामुळे आणखी एक मंत्रिपद रिक्त होण्याची शक्यता आहे. याशिवाय केंद्रीय मंत्री पंकज चौधरी आणि हर्ष मल्होत्रा यांची अनुक्रमे उत्तर प्रदेश आणि दिल्ली भाजप प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या 'एक व्यक्ती, एक पद' धोरणानुसार त्यांनाही मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागू शकतो.

केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी आणि बी. एल. वर्मा यांचा राज्यसभा कार्यकाळ यावर्षी नोव्हेंबरमध्ये संपत असल्याने त्यांच्या राजकीय भवितव्याबाबतही लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

(पान ४ वर)

### शिंदे गटाचे वजन वाढणार?

**महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींमुळेही या फेरबदलाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्धव ठाकरे गटातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) शिंदे गटाचे संख्याबळ वाढले आहे. त्यामुळे राजकीय समतोल राखण्यासाठी शिंदे गटाला केंद्र मंत्रिमंडळात अतिरिक्त प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

## पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा द्या

### आमदार अमोल खताळांचा विधानसभेत आवाज

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ चा पीकविमा अद्याप मिळालेला नसल्याचा गंभीर प्रश्न आमदार अमोल खताळ यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे उपस्थित केला. यावेळी त्यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे लक्ष वेधत तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीकविम्याचा लाभ देण्याची मागणी केली.

आमदार खताळ यांनी सभागृहात मांडलेल्या माहितीनुसार, खरीप हंगाम २०२५ दरम्यान तालुक्यातील अनेक भागांत अतिवृष्टी, अवकाळी पाऊस तसेच इतर प्रतिकूल हवामानामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला. मात्र कृषी विभागाच्या प्रशासकीय त्रुटी व संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना अद्याप पीकविम्याचा लाभ मिळालेला नाही. शेतकऱ्यांनी नियमांनुसार विमा भरलेला असतानाही त्यांना हक्काची नुकसान भरपाई मिळाली नसल्याने तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर हा अन्याय असल्याचे त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले.




पीकविमा योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या त्रुटींसाठी जबाबदार असलेल्या कृषी विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच विमा कंपनीला आवश्यक निर्देश देऊन संगमनेर तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीकविम्याची रक्कम वितरित करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी कृषिमंत्री भरणे यांच्याकडे केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपण सातत्याने पाठपुरावा करणार असून, तालुक्यातील एकाही पात्र शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही, अशी भूमिका आमदार खताळ यांनी यावेळी व्यक्त केली.










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# चिखलीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणार - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चिखली गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व कामांना प्राधान्य देत निधी उपलब्ध करून दिला जाईल. विकासकामांमध्ये कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर तालुक्यातील चिखली येथे चिखली ते वडापूर अमृतेश्वर मंदिर प्रत्येक कामासह इतर रस्ते कामांचे भूमिपूजन आणि विविध विकास कामांची लोकार्पण आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते झाले त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोपान सहाने होते. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रणजीत ढेरंगे भाजप अध्यक्ष अशोक कानवडे नेताजी घुले महेंद्र कोल्हे शंकर वाळे भाऊसाहेब हासे, सोमनाथ सिनारे, साईनाथ सहाने, , तुळशीराम सिनारे, अशोक देशमुख, विक्रांत देशमुख, विकास हासे, सोमनाथ हासे, गणेश,हासे नितीन हासे विठ्ठल सिनारे, यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वर्षभरात चिखली या गावासाठी सुमारे ७९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. आमदार खताळ म्हणाले की, लोक मोठ्या विश्वासाने विविध प्रश्न घेऊन माझ्याकडे येतात. केवळ विकास कामेच नव्हे तर कौटुंबिक वाद-विवादां मध्येही समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. जनतेला दिलेला शब्द पाळणे आणि शक्य ते प्रत्येक काम पूर्णत्वास नेणे हेच आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. येथून मागील काळात तालुक्यातील रस्त्यांचे झालेले नुकसान माझ्या कार्य काळात होऊ देणार नाही. अधिकारी व ठेकेदारांना दर्जेदार काम करण्या बाबतच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. महायुती सरकारच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना, साडेसात अश्व शक्तीपर्यंतच्या वीजबिलीं सवलत, महिलांसाठी विविध योजना तसेच गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत देण्याचे काम प्रभावी पणे सुरू असल्याचे सांगितले

**संगमनेर तालुक्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने पाठपुरावा आणि प्रयत्न सुरू आहेत. पाणीटंचाई, खराब रस्ते, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था, वीजपुरवठा तसेच बिबट्याच्या वाढत्या उपद्रवा सारख्या गंभीर समस्यांवर प्रभावी पणे उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून काम करण्यात येत आहे.**

**आमदार अमोल खताळ**

# जादूटोण्यासाठी अंतर्वस्त्रांची चोरी

## संगमनेरात एकाविरूद्ध गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील कृष्णानगर परिसरात घराबाहेर वाळत घातलेले कपडे चोरी केल्याप्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी ( रा. विडी कामगार वसाहतीमागे, संगमनेर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ जून २०२६ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांच्या घराबाहेर वाळत घातलेले कपडे चोरी होत असल्याचे निदर्शनास आले. संशयित व्यक्तीस पकडून विचारणा केली असता त्याने आपले नाव ओम कोकाटे असे सांगितले.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, ओम कोकाटे याने सदर कपडे संदीप महादू डोंगरे (रा. कृष्णानगर, संगमनेर) यांच्या सांगण्यावरून पैसे व कथित जादूटोणा करण्याच्या उद्देशाने चोरल्याची कबुली दिल्याचा दावा करण्यात आला आहे. फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे की, संदीप डोंगरे यांच्याशी पूर्वीपासून वाद असून त्यांच्याविरुद्ध यापूर्वी मारहाणीचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. त्यातूनच वारंवार त्रास देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये सुमारे २०० रुपये किंमतीच्या लाल व चॉकलेटी रंगाच्या फुलांच्या डिझाइन असलेल्या दोन अंतर्वस्त्रांचा समावेश आहे.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# सीआयएसएफचे सेवानिवृत्त मेजर सुखदेव गाडेकर यांचे अपघाती निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - आंबीखालसा (ता. संगमनेर) येथील येठेवाडीचे रहिवासी आणि सीआयएसएफ दलाचे सेवानिवृत्त कर्मचारी मेजर सुखदेव नामदेव गाडेकर यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (२२ जून) आंबीखालसा येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. मेजर गाडेकर हे घारगाव येथे जात असताना एका भरधाव वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर



जखमी झाले. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

गाडेकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मोलमजुरी करत आपले शिक्षण पूर्ण केले होते. त्यानंतर ते सीआयएसएफ दलात भरती झाले. सेवा काळात देशातील विविध राज्यांमध्ये कर्तव्य बजावल्यानंतर सेवानिवृत्त होऊन ते गावी शेती करत होते. सोमवारी येठेवाडी येथील राहत्या घरापासून त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. स्मशानभूमीत सीआयएसएफच्या वतीने त्यांना

शासकीय मानवंदना देण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जगदीश राऊत आणि कॉन्स्टेबल अभिजीत पवार यांनी पुष्पचक्र अर्पण करून त्यांना अखेरची सलामी दिली. यावेळी ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्रॅक्टर मालकाच्या सातबारावर ६ लाख ८८ हजारांचा बोजा

## सरकारी मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी संगमनेर तहसीलदारांची कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे प्रवरा डाव्या कालव्यानजीकचा सार्वजनिक रस्ता ट्रॅक्टरने नांगरून नुकसान करणाऱ्या प्रकरणाची महसूल विभागाने गंभीर दखल घेतली आहे. संगमनेरचे तहसीलदार धिरज मांजरे यांनी याप्रकरणी कडक पाऊल उचलत ट्रॅक्टरच्या मूळ मालकाच्या सातबारा उताऱ्यावर ६ लाख ८८ हजार ५३६ रुपयांचा बोजा चढवण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईमुळे सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.




७ मे २०२६ रोजी उंबरी

बाळापूर येथील महेश उर्फ छोट्या अनिल सरोदे याने संगमनेर-जोर्वे-आश्वी-कोल्हार या जिल्हा मुख्य मार्गाचे काम सुरू असताना कालव्यानजीकचा रस्ता ट्रॅक्टरने नांगरला होता. यामुळे कालव्याच्या भरावाला धक्का लागून तो फुटण्याची भीती आणि मानवी जीविताला धोका निर्माण झाला होता. स्थानिक नागरिकांनी विरोध केला असता संबंधिताने शिवीगाळ करत सोशल मीडियावर व्हिडिओ टाकून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी गाव बंद ठेवून आक्रमक पवित्रा घेतला होता. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभागाने केलेल्या पाहणीनुसार या कृत्यामुळे १ लाख ७२ हजार १३४ रुपयांचे नुकसान झाले होते. या नुकसानीची वसुली करण्यासाठी तहसीलदार कार्यालयाने मूळ नुकसानीच्या चार पट म्हणजेच ६ लाख ८८ हजार ५३६ रुपये दंड आकारला आहे. गुन्ह्यात वापरलेला ट्रॅक्टर (क्र. एमएच १७ डीसी ४१९७) उंबरी येथील सुभाष नानासाहेब भुसाळ यांच्या मालकीचा असल्याचे तपासात समोर आले. त्यामुळे तहसीलदार मांजरे यांनी तलाठ्यांना भुसाळ यांच्या सातबारा उताऱ्यावर य दंडाच्या रकमेचा बोजा चढवण्याचे आदेश दिले आहेत.

# संगमनेर तालुक्यातील ५९ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ११.८८ कोटी जमा - आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा २३ वा हप्ता देशभरातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. या अंतर्गत संगमनेर तालुक्यातील ५९ हजार ४०३ शेतकऱ्यांच्या खात्यावर तब्बल ११ कोटी ८८ लाख ६ हजार रुपयांची रक्कम थेट वर्ग करण्यात आली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर मिळालेल्या या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

पीएम-किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. प्रत्येक हप्त्यात २ हजार रुपये थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा केले जातात. शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके तसेच शेतीसाठी आवश्यक असलेल्या इतर खर्चांसाठी ही मदत उपयुक्त ठरत आहे.



दरम्यान, कृषी विभागाने लाभार्थी शेतकऱ्यांना ई-केवायसी, आधार क्रमांकाची बँक खात्याशी जोडणी आणि खात्याची माहिती अद्ययावत ठेवण्याचे आवाहन केले आहे.

ज्या शेतकऱ्यांची कागदपत्रे अपूर्ण आहेत किंवा ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, त्यांनी ती तातडीने पूर्ण करून पुढील हप्त्यांचा लाभ सुनिश्चित करावा, असेही विभागाकडून सांगण्यात आले आहे. तालुक्यातील ५९ हजारांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात थेट निधी जमा झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असून खरीप हंगामातील आर्थिक गरजा भागविण्यास मदत होणार आहे.

# भाड्याने घेतलेल्या ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट

## संगमनेरच्या व्यक्तीची फसवणूक



ट्रॅक्टर भाड्याने घेऊन

त्याचे भाडे न देता तसेच ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट लावून संगमनेर तालुक्यातील खांबे येथील मालकाची फसवणूक केल्याप्रकरणी येथील एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बापुसाहेब नानासाहेब शिंदे (वय ३४, मूळ रा. खांबे, ता. संगमनेर, सध्या रा. नवनागापूर, अहिल्यानगर) यांनी सोमवारी (२२ जून) पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मल्हारी गहिनीनाथ जायभाय (रा. थाटे, ता. शेवगाव) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी

१२ वाजताच्या सुमारास नवनागापूर येथे घडली असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. फिर्यादी बापुसाहेब शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, मल्हारी जायभाय याने त्यांच्याकडून विजेच्या तारा ओढण्याच्या कामासाठी भाडेतत्त्वावर ट्रॅक्टर (एमएच १७बीएक्स ४५२४) घेतला होता. मात्र ट्रॅक्टरचे ठरलेले भांडे ने देता संशयित आरोपीने ट्रॅक्टरची कोठेतरी विल्हेवाट लावली. तसेच विश्वासघात करूम आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी शिंदे यांनी २२ जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार खेडकर करीत आहेत.

# काँग्रेसचे राजकीय कुटुंब पुन्हा एकत्र येत आहे का ?

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस... भारताच्या स्वातंत्र्यलढ्यापासून ते आजच्या राजकारणापर्यंत सातत्याने उपस्थित असलेलं नाव. गेल्या दशकभरात काँग्रेसला पराभव, नेतृत्वावरील प्रश्नचिन्हं, संघटनात्मक कमकुवतपणा आणि अस्तित्वाच्या संकटाचा सामना करावा लागला. अनेक राजकीय विश्लेषकांनी काँग्रेसचा काळ संपल्याची घोषणाही केली. मात्र भारतीय राजकारणाचा इतिहास सांगतो की काँग्रेसला कधीही केवळ जागांच्या आकड्यांत मोजता येत नाही.

कारण काँग्रेस हा फक्त एक राजकीय पक्ष नाही; ती अनेक राजकीय प्रवाहांची जननी आहे. गेल्या शतकभरात काँग्रेसमधून डझनावारी नव्हे तर जवळपास पन्नासहून अधिक राजकीय पक्ष बाहेर पडले. काही विचारधारात्मक मतभेदांतून जन्माला आले, काही नेतृत्वाच्या संघर्षातून तर काही प्रादेशिक महत्त्वाकांक्षांमधून. राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, वायएसआर काँग्रेस, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील विविध प्रादेशिक शक्ती, केरळ व ईशान्य भारतातील अनेक संघटना - या सर्वांची राजकीय नाळ कधीतरी काँग्रेसशी जोडलेली होती.

या फुटींमुळे काँग्रेसचं सर्वाधिक नुकसान झालं. कारण हे पक्ष भाजप किंवा डाव्या पक्षांची मतं घेऊन आले नव्हते; त्यांनी काँग्रेसचीच सामाजिक, राजकीय आणि मतदारांची जागा व्यापली. परिणामी अनेक राज्यांमध्ये काँग्रेसची संघटना कमकुवत झाली आणि राष्ट्रीय स्तरावरील तिचं वर्चस्व हळूहळू कमी होत गेलं.

मात्र भारतीय राजकारणात एक गोष्ट कायम



असते - परिस्थिती बदलत राहते.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राहुल गांधींच्या नेतृत्वावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात होते. २०१४ आणि २०१९ च्या पराभवानंतर काँग्रेसच्या भवितव्याबद्दल अनेकांनी शंका व्यक्त केल्या होत्या. पण भारत जोडो यात्रेनंतर तयार झालेलं राजकीय वातावरण आणि त्यानंतरच्या लोकसभा निवडणुकीतील काँग्रेसची सुधारलेली कामगिरी यामुळे विरोधी राजकारणातील समीकरणं बदलू लागली. विशेष म्हणजे या नव्या वातावरणाचा फायदा केवळ काँग्रेसलाच झाला नाही. समाजवादी पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), डीएमके यांसारख्या मित्रपक्षांनाही त्याचा लाभ झाला. त्यामुळे विरोधी आघाडीत काँग्रेसचं केंद्रस्थान पुन्हा मजबूत झाल्याचं चित्र दिसू लागलं.

याच पार्श्वभूमीवर दोन नेत्यांकडे विशेष लक्ष वेधलं जातं - शरद पवार आणि ममता बॅनर्जी.

हे दोघेही नेते काँग्रेसपासून स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्याचं प्रतीक मानले गेले. शरद पवारांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, तर ममता बॅनर्जी यांनी त्याआधी तृणमूल काँग्रेस उभी केली. दोघांनीही आपल्या राज्यात काँग्रेसला पर्याय निर्माण केला आणि स्वतंत्र राजकीय प्रभाव निर्माण केला.

मात्र अलीकडच्या घडामोडी वेगळ्याच दिशेचे संकेत देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिनानिमित्त शरद पवारांनी केलेलं भाषण अनेकांच्या भुवया उंचावणारं ठरलं. जवळपास अर्धा तास चाललेल्या भाषणात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या योगदानाचा विशेष गौरव केला. काँग्रेसच्या ऐतिहासिक भूमिकेचं कौतुक केलं. हे केवळ औपचारिक स्तुतिसुमन नव्हतं; अनेकांना त्यामागे एक सूक्ष्म राजकीय संदेश दडलेला असल्याची जाणीव झाली.

शरद पवारांच्या राजकीय शैलीचा अभ्यास करणारे जाणकार नेहमी एक गोष्ट सांगतात - पवारांच्या विधानांचा अर्थ अनेकदा काही महिन्यांनी स्पष्ट होतो. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्याकडे केवळ भावनिक स्मरण म्हणून पाहणं धाडसाचं ठरेल. दुसरीकडे पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींची भूमिका देखील बदलताना दिसत आहे. एकेकाळी काँग्रेसला राज्यात राजकीय अवकाश न देणाऱ्या आणि राहुल गांधींच्या नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करणाऱ्या ममता आज दिल्लीत राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांची भेट घेत आहेत. राजकीय वर्तुळात तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेसमधील संबंध अधिक जवळ येण्याच्या चर्चा सुरू आहेत. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे हे काळच ठरवेल. मात्र या घडामोडींचं राजकीय महत्त्व नाकारता येणार नाही.

कारण आज भारतीय राजकारणातील अनेक प्रादेशिक पक्ष अस्तित्वाच्या संघर्षात अडकलेले दिसतात. भाजपच्या वाढत्या प्रभावासमोर स्वतंत्रपणे लढण्याची त्यांची क्षमता मर्यादित होत चालली आहे. अशा परिस्थितीत भाजपविरोधी राष्ट्रीय राजकारणात काँग्रेस हा एकमेव पक्ष दिसतो जो देशव्यापी संघटना, राष्ट्रीय नेतृत्व आणि सर्व राज्यांतील उपस्थिती या तिन्ही गोष्टी एकाच वेळी देऊ शकतो. म्हणूनच आजचा प्रश्न फक्त ममता बॅनर्जी काँग्रेसमध्ये येणार का किंवा राष्ट्रवादी काँग्रेसचं भवितव्य काय यापुरता मर्यादित नाही.

खरा प्रश्न अधिक व्यापक आहे.

गेल्या तीन दशकांत काँग्रेसमधून बाहेर पडलेले राजकीय प्रवाह पुन्हा काँग्रेसभोवती एकत्र येऊ लागले आहेत का? जर तसं असेल, तर भारतीय राजकारण एका नव्या ऐतिहासिक टप्प्यात प्रवेश करत आहे. कारण १९९० नंतरचं युग हे काँग्रेसमधून फुटलेल्या प्रादेशिक शक्तींच्या उदयाचं होतं. तर २०२९ च्या दिशेने जाणारं दशक काँग्रेसच्या नेतृत्वाखाली त्या शक्तींच्या पुनर्रचनेचं ठरू शकतं.

कदाचित म्हणूनच आज काँग्रेसकडे किती जागा आहेत हा प्रश्न दुय्यम ठरतो आहे.

अधिक महत्त्वाचा प्रश्न हा आहे.

काँग्रेसचं राजकीय कुटुंब पुन्हा एकत्र येत आहे का? या प्रश्नाचं उत्तर केवळ काँग्रेसचं नव्हे, तर पुढील दशकातील भारतीय राजकारणाची दिशा ठरवू शकतं.







धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# प्रकाशकांनी 30 जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावेत

## विवरणपत्र दाखल न केल्यास दहा हजारांचा दंड



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम,२०२३अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल,असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

# दहावी पुणे–पंढरपूर सायकल वारी उत्साहात




पुणे (वृत्तसंस्था)

संपूर्ण भारतातील क्रीडा व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या इंडो अथलेटिक्स सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेली दहावी पुणे-पंढरपूर सायकल वारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. देहू येथील गाथा मंदिरातून पहाटे प्रस्थान केलेल्या या वारीत तब्बल २३५० सायकलस्वारांनी सहभाग नोंदवत २३५ किलोमीटरचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला.

यंदाचे वर्ष सायकल वारीच्या दहाव्या पर्वाचे असल्याने सहभागींचा उत्साह विशेष पाहायला मिळाला. मागील सर्व वर्षांतील विक्रम मोडत देशभरातून आलेल्या सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभाग घेतला. पीसीएमसीचे बापूसाहेब गायकवाड, एमआयडीसीचे अधिकारी प्रकाश शेटबाळे, उद्योजक अन्नारे बिरादार, तात्यासाहेब शेवाळे, बैद्यनाथ हॉस्पिटल संभाजीनगरचे डॉ. संदीप सानप व अनिल सानप, महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक श्रीराम पानझाडे तसेच आयएएस अधिकारी गजानन खैरे, अजित पाटील, गणेश भुजबळ यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

इंडो अथलेटिक्स सोसायटीचे वारी प्रमुख गिरीराज उमरीकर यांनी सांगितले की, वारीचे हे दहावे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्व सहभागी सायकलस्वारांनी एका दिवसात देहू ते पंढरपूर हा प्रवास पूर्ण केला. विशेष म्हणजे यंदा सुमारे ३०० महिला आणि १०० हूनअधिक बालसायकलस्वारांनी सहभाग घेतला. महाराष्ट्राबाहेरील विविध राज्यांतूनही मोठ्या प्रमाणावर सायकलस्वार या उपक्रमात सहभागी झाले.

भारतात सायकल वारीची परंपरा रुजविण्याच्या उद्देशाने इंडो अथलेटिक्स सोसायटीने २०१६ मध्ये अवघ्या सात जणांसह या उपक्रमाची सुरुवात केली होती. त्यानंतर २०१७ मध्ये २४, २०१८ मध्ये १६०, २०१९ मध्ये सुमारे ५०० सहभागी झाले. कोविड काळातही हा उपक्रम खंडित झाला नाही. २०२१ मध्ये १७५ जणांनी पुणे-पंढरपूर अंतर पूर्ण केले. त्यानंतर २०२२ मध्ये १२००, २०२३ मध्ये १५००, २०२४ मध्ये १७५०, २०२५ मध्ये १९५० आणि यंदा २३५० हून अधिक सायकलस्वार सहभागी झाले. त्यामुळे भारतातील सर्वात मोठी सायकल वारी म्हणून या उपक्रमाने नवा इतिहास रचल्याची माहिती संस्थापक सदस्य गजानन खैरे यांनी दिली. तसेच प्रमुख सदस्य अजित पाटील व गणेश भुजबळ यांनी वारी मार्ग आणि नियोजनाविषयी सविस्तर माहिती दिली.

देहू, निगडी, नाशिक फाटा, हडपसर, उरुळी कांचन, भिगवण, इंदापूर, टेंभुर्णी मार्गे पंढरपूरपर्यंतचा प्रवास सायकलस्वारांनी पूर्ण केला. या भव्य उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गिरीराज उमरीकर, अविनाश चौगुले, अमित पवार, अनुप कोहले, अजित गोरे, अविनाश अनुसे, अभिजीत सरोदे, अजय चौरसिया, दीपक गुरुकुल, देविदास खुर्द, कपिल पाटील, मारुती विधाते, मंदार शेंडे, नितीन पवार, प्रदीप टाके, प्रमोद चिंचवडे, प्रणय कडू, प्रतीक पवार, प्रशांत तायडे, पवन आहेर, प्रशांत जाधव, रमेश माने, राहुल राणे, संतोष नखाते, सुनील चाकू, सुशील मोरे, श्रीकांत चौधरी, तुषार माने, विवेक कडू, योगेश तावरे, सुधाकर टिळेकर, शैलेश पाटील, अमृता पाटील, मनोज काशीद, नारायण मगडूत, मदन शिंदे, हेमंत दांगट पाटील यांच्यासह अनेक स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. इंदापूर येथे नगरपालिकेतर्फे नगराध्यक्ष भरतभाई शहा, तर टेंभुर्णी येथे शिवसेनेचे नेते संजय बाबा कोकाटे यांचे सहकार्य लाभले.

# एकल महिलांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य- गटविकास अधिकारी



देवठाण- केंद्र व राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरणाशी संबंधित विविध योजनांचा लाभ एकल व गरजू महिलांना प्राधान्याने देण्यात येईल. तसेच रोजगार हमी योजना, घरकुल, पशुसंवर्धन, समाजकल्याण, कृषी, महिला व बालविकास विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करतानाही एकल महिलांना विशेष प्राधान्य दिले जाईल, तसेच सर्वच महिलांनि बचत गटात सहभाग घ्यावा आणि उद्योग व्यवसाय सुरू करण्यापासून ते विक्री करेपर्यंत जी काही मदत, माहिती लागेल ती देण्याचे आश्वासन अकोले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने यांनी दिले.

आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त देवठाण येथे ग्रामपंचायत देवठाण आयोजित एकल महिला मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण शेळके, सरपंच विजया सहाणे, ग्रामपंचायत अधिकारी संजय वाघ, महिला व एकात्मिक बालविकास विभागाच्या पर्यवेक्षिका भनगडे, पद्मा पाटोळे, शीला शेळके, विमल खुळे, सरला येलमामे, हिरा काळे, प्रतीक्षा बोडके, भागूबाई कातोरे, नंदा जोरवर, वनिता शेळके, संगीता मालुंजकर, चंद्रकला जोरवर, नंदा मेंगाळ, सुरेखा शेळके, कल्पना निरगुडे, ताराबाई शेळके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मेळाव्याच्या प्रारंभी ग्रामपंचायत व जनसेवा ग्रामविकास मंडळाच्या वतीने देवठाण येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आरोग्य विभागाच्या वतीने गरजू महिलांना आयुष्मान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. एसएमबीटी डेंटल रुग्णालय, ग्रामपंचायत देवठाण व जनसेवा ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.तसेच छउचउ बस सेवा कार्ड नोंदणी शिबिराचे ही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात महिलांनी सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणात नोंदणी केली.

यावेळी उपस्थित एकल महिलांनी मुलांचे पालनपोषण, संगोपन, आरोग्यविषयक प्रश्न, कौटुंबिक अडचणी,शासकीय योजना बाबत माहिती तसेच उपजीविकेच्या समस्या मांडल्या. मान्यवरांनी त्यांच्या समस्या समजून घेत त्यावर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंचायत समितीचे माजी सदस्य तथा जनसेवा ग्रामविकास मंडळाचे संस्थापक अरुण शेळके यांनी केले. ग्रामविकास अधिकारी श्री. वाघ यांनी सूत्रसंचालन केले. सरपंच विजया सहाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पंचायत समितीच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि एसएमबीटी डेंटल रुग्णालयाचे डॉक्टर तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जात वैधता प्रमाणपत्रांतील त्रुटी पूर्ततेसाठी २४ व २५ जून रोजी शिबिर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर :- छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती २६ जून सामाजिक न्याय दिनानिमित्त प्रलंबित जात वैधता प्रमाणपत्रांतील त्रुटी दूर करण्यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने २४ व २५ जून २०२६ रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ऑनलाइन प्रणालीद्वारे त्रुटी कळविण्यात आल्यानंतरही अद्याप त्रुटींची पूर्तता न केलेल्या अर्जदारांनी या संधीचा लाभ घेत आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत समिती कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, उपायुक्त राकेश पाटील व सदस्य सचिव अनिल तिदमे यांनी केले आहे.

बारावी विज्ञान शाखेची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि सीईटीच्या माध्यमातून व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जात पडताळणीचे प्रस्ताव हार्ड कॉपी स्वरूपात तात्काळ समितीच्या कार्यालयात सादर करावेत. यामुळे प्रवेशावेळी होणारी धावपळ टाळता येईल. तसेच सेवाविषयक प्रकरणांमध्ये ज्या अर्जदारांना ऑनलाइन त्रुटी कळविण्यात आलेल्या आहेत, त्यांनीही तात्काळ कार्यालयात येऊन प्रस्तावाची हार्ड कॉपी सादर करणे आवश्यक आहे.

जात पडताळणी प्रक्रियेसाठी अर्जदारांनी खाजगी सेतू चालक किंवा इतर त्रयस्थ व्यक्तींवर अवलंबून राहू नये. अर्ज भरताना स्वत:चा अथवा पालकांचा अचूक ई-मेल आयडी व दूरध्वनी क्रमांक नमूद करावा. शपथपत्रातील वंशावळ ही संबंधित अधिकृत कागदपत्रांच्या आधारेच तयार करावी. तसेच ऑनलाइन अर्ज करताना वापरलेले युजरनेम व पासवर्ड स्वत:कडे जतन करून ठेवावेत. समितीने गतवर्षभरात उल्लेखनीय कामगिरी करत जून २०२५ ते मे २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ३८ हजार २०२ प्रकरणांपैकी ३६ हजार ०४८ प्रकरणे निकाली काढली आहेत. सध्या २ हजार १५४ प्रकरणे प्रक्रियेत आहेत.

# नाथ सेवेकऱ्यांच्या योगदानातून देवस्थानातील धार्मिक उपक्रमांना बळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभाव परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन येथे घडते या देवस्थानात हिंदू रिती रिवारजनुसार दररोज श्री कान्होबा देवाच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध , हार फुले अर्पण केली जातात. सकाळची आरती गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव, नवनाथ आरती सकाळी ६ वाजता तर सायंकाळची आरती ७.३० वाजता होते. त्याचबरोबर गुरुवारी विशेष महाआरती होऊन महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप होते. ही परंपरा गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपली आहे. देवस्थानातील सर्व पूजा सुकेवाडी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातूनच पार पडते. आकाश शशिकांत सातपुते, अशोक महादू खर्डे सुकेवाडी हे दोघेही नित्य पूजा व धार्मिक विधी पार पाडत आहेत.

नित्य पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू व खर्च दररोजच्या पूजेसाठी हार, कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर, अशा विविध वस्तूंचा वापर केला जातो. जून २०२६ महिन्यातील ३० दिवसांसाठी या सर्व वस्तूंचा एकूण खर्च सुमारे ३००० रुपये इतका झाला असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी शरद रायभान कुटे, वैभव अशोक सातपुते, संपत महादेव सातपुते, निलेश तान्हाजी गुंजाळ, अनुकेश रामदास राऊत, सुकेवाडी यांनी वस्तू स्वरूपाने उचलला आहे. दर पौर्णिमेला देवस्थानात होम - हवनाचे आयोजन केले जाते. या होमासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले, फळे, आधी वस्तूंचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण खर्च सुमारे ४००० रुपये असून हा खर्च गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी भाऊसाहेब लक्ष्मण कुटे, राजेंद्र चंद्रकांत सातपुते, पोपट शिवाजी सातपुते, आप्पासाहेब लहानु सातपुते, यांनी वस्तू स्वरूपाने केला आहे. सुकेवाडीतील हे नाथ सिद्धपीठ केवळ धार्मिक स्थळ नसून गावकऱ्यांच्या एकोप्याचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. नित्य पूजा पौर्णिमेचे होम - हवन गुरुवारची महाआरती आणि महाप्रसाद या माध्यमातून येथे भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवली जात आहे.

# लिंग गुणोत्तर सुधारणा आणि पल्स पोलिओ अभियानावर विशेष भर : जिल्हाधिकारी



अहिल्यानगर, दि. २३-जिल्ह्यात मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर संतुलित राखण्यासाठी लिंग गुणोत्तर कमी असलेल्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित करावे. ग्रामस्थांसाठी जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करून समाजामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करावे. तसेच येत्या २८ जून रोजी राबविण्यात येणारे पल्स पोलिओ अभियान प्रभावीपणे आणि यशस्वीरीत्या राबवून एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आरोग्य विभागाच्या कामकाज आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, अशासकीय सदस्य डॉ. सुधा कांकरिया यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी तालुका स्तरावरील लिंग गुणोत्तर सनियंत्रण समितीच्या तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली नियमित बैठका घेण्यात याव्यात. बैठकींमध्ये ग्रामसेवक, सरपंच आणि संबंधित अधिकाऱ्यांचा समावेश करून कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गावांमध्ये विशेष उपक्रम राबवावेत. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत सोनोग्राफी केंद्रांवर अचानक तपासण्या करण्यात याव्यात तसेच तपासणी प्रक्रियेतील बारकावे समजून घेण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्यांसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

येत्या २८ जून रोजी होणाऱ्या पल्स पोलिओ अभियानासाठी आवश्यक लसींचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा, आरोग्य पथके तैनात करावीत आणि दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष नियोजन करावे. अभियानाची सर्व स्तरांवर व्यापक प्रसिद्धी करून एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची काटेकोर दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकरी पंढरपूरकडे जात असल्याने त्यांच्या मुक्कामस्थळी वैद्यकीय शिबिरे आयोजित करावीत. त्याचबरोबर आयुष्मान भारत योजनेअंतर्गत नोंदणी व आरोग्य सेवा शिबिरांचेही आयोजन करावे. या उपक्रमात महानगरपालिका, विविध आरोग्य संस्था तसेच सेवाभावी संस्थांचा सहभाग वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

आरोग्य सेवांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही दिल्या. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना वेळेत निदान व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ट्रूनेट आणि सी-नेट प्रणालीचा प्रभावी वापर करावा.

क्षयरोगासह विविध संसर्गजन्य आजारांचे निदान जलद गतीने होण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यक्षम ठेवाव्यात. प्रत्येक तालुक्यात ‘टीबी मुक्त भारत’अभियानांतर्गत समाधानकारक प्रगती होण्यासाठी आरोग्य यंत्रणेने समन्वयाने काम करावे. संशयित क्षयरुग्णांचे वेळेत निदान होऊन त्यांना योग्य उपचार मिळावेत यासाठी तपासण्याची संख्या अधिक प्रमाणात वाढवावी. तसेच निक्षय पोर्टलवर रुग्णांची वेळोवेळी नोंदणी करून उपचार प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवावी. डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांच्या प्रतिबंधासाठी नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये घरोघरी भेट देऊन सर्व्हेक्षण करण्यात यावे. बीसीजीसह बालकांना देण्यात येणाऱ्या सर्व लसीकरण कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

## संपादकीय...

# आणीबाणीचे ५१ वर्षे लोकशाहीच्या संघर्षाची आठवण

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात २५ जून १९७५ हा दिवस एका महत्त्वपूर्ण आणि वादग्रस्त घटनेमुळे कायम स्मरणात राहिला आहे. आज या घटनेला ५१ वर्षे पूर्ण होत आहेत. २५ जून १९७५ च्या मध्यरात्री तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशात आणीबाणी लागू करण्यात आली. पुढील २१ महिने भारतातील राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय व्यवस्थेवर या निर्णयाचा दूरगामी परिणाम झाला. भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून लागू करण्यात आलेली ही आणीबाणी स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वाधिक चर्चिली गेलेली घटना मानली जाते. आणीबाणीची पार्श्वभूमी १२ जून १९७५ रोजी घडलेल्या एका महत्त्वाच्या न्यायालयीन निर्णयात दडलेली होती. अलाहाबाद उच्च न्यायालयाने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची १९७१ मधील लोकसभा निवडणूक अवैध ठरवली. विरोधी नेते राजनारायण यांनी निवडणुकीत गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करत त्यांना पुढील सहा वर्षे निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवले. या निकालामुळे देशाच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. विरोधी पक्षांनी इंदिरा गांधी यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी सुरू केली. इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला पूर्ण स्थगिती दिली नाही; मात्र अंतिम निकाल येईपर्यंत त्यांना पंतप्रधान म्हणून कार्य करण्याची मुभा दिली. या घडामोडींमुळे राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला. देशभरात आंदोलनांची लाट उसळली. समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली सरकारविरोधी आंदोलनाला वेग आला. या पार्श्वभूमीवर देशात अंतर्गत अस्थिरता निर्माण झाल्याचे कारण देत २५ जून १९७५ च्या रात्री आणीबाणी जाहीर करण्यात आली. आणीबाणी लागू झाल्यानंतर केंद्र सरकारच्या हातात व्यापक अधिकार आले. देशातील वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमांवर सेन्सॉरशिप लागू करण्यात आली. सरकारविरोधी बातम्या प्रसिद्ध करण्यावर निर्बंध आले. अनेक विरोधी पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि विचारवंत यांना 'मिसा' अर्थात मेंटेनन्स ऑफ इंटरनल सिक्युरिटी क्ट अंतर्गत अटक करण्यात आली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, मोरारजी देसाई, चरणसिंग, नानाजी देशमुख, मधु दंडवते यांच्यासह हजारो राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. विविध अभ्यासांनुसार या कालावधीत लाखो लोकांना अटक किंवा नजरकैदेत ठेवण्यात आले. आणीबाणीच्या काळात काही प्रशासनिक सुधारणा आणि विकासाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. रेल्वे, सरकारी कार्यालये आणि इतर सार्वजनिक यंत्रणांमध्ये शिस्त वाढल्याचा दावा त्यावेळी सरकारकडून करण्यात आला. मात्र दुसरीकडे सक्तीची नसबंदी, झोपडपट्टी हटविण्याच्या मोहिमा आणि नागरिक स्वातंत्र्यावर आलेले निर्बंध यांमुळे मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली. विशेषतः संजय गांधी यांच्या प्रभावाखाली राबवण्यात आलेल्या काही योजनांवर मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याचे आरोप झाले.

## - जाहीर सुचनापत्र -

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार**

**(फक्त सभासदांकरीता)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. खांबे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना या सुचनापत्राद्वारे सुचित करण्यांत येते की, आपल्या संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी या मतदार संघातील नैमित्तिक रिक्त एक पदाच्या निवडीकरीता मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचेकडील जा.क्र.३६७९ दिनांक १९/०६/२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. राजेश जोशी, सहकार अधिकारी (श्रेणी-२), संगमनेर, यांची अध्यासी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याने, त्यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक ३/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. संस्था कार्यालय, खांबे, ता. संगमनेर या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सदर विशेष सभेस संस्थेच्या सर्व संचालकांनी उपस्थित रहावे.

**दिनांक २४/०६/२०२६**

**(राजेश जोशी)**
**अध्यासी अधिकारी,**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या, खांबे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर,**

# नान्नज येथे जागतिक योग दिनी मानवी साखळीतून शांतता संदेश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जागतिक योग दिनानिमित्त २१ जून रोजी सह्याद्री संस्थेच्या श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथे मानवी साखळीद्वारे योग दिन रेखाटन करत आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा झाला अशी माहिती मुख्याध्यापक सोनवणे एच आर यांनी दिली. या उपक्रमात योग सप्ताहात विद्यालयातील ४७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायाम करून योगाचे महत्त्व अधोरेखित केले.

सध्या जगभरात विविध संघर्ष व युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत असताना शांतता, सहकार्य आणि बंधुत्वाचा संदेश देण्यासाठी विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार केली.

यावेळी जागतिक फुटबॉल स्पर्धाच्या पार्श्वभूमीवर फुटबॉलच्या आकृतीची रचना करण्यात आली. क्रीडा आणि योग यांच्या माध्यमातून जगातील सर्व देशांनी एकत्र येऊन शांतता व मैत्रीचा मार्ग स्वीकारावा, असा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

योगामुळे शरीर, मन आणि बुद्धी यांचा समतोल साधला जातो. तसेच निरोगी जीवनशैली, शिस्त आणि सकारात्मक विचारांची जोपासना होते, हे विद्यार्थ्यांनी कृतीतून दाखवून दिले. या अनोख्या उपक्रमामुळे योग दिनाला सामाजिक जाणीव आणि जागतिक बंधुत्वाची प्रेरणादायी जोड मिळाली.

मुख्याध्यापक सोनवणे एच आर यांचे मार्गदर्शनाखाली कलाशिक्षक. एस. के. वाकचौरे ,क्रीडा शिक्षक मंगेश गडाख व योग मार्गदर्शक बाळासाहेब पिंगळे यांनी योग दिनाचे मानवी साखळी द्वारे संकल्पना साकारली. विद्यार्थ्यांनी ताडासन,वृक्षासन, पादहस्तासन ,त्रिकोणासन, पर्वतासन,वज्रासन, मंडूकासन, वक्रासन,शशांकासन, पद्मासन, सेतूबंधासन, पवनमुक्तासन, शवासन, मकरासन,भुजंगासन, शलभासन,व विविध अनुलोम विलोम, कपालभाती ,आदि विविध प्राणायाम प्रकार करत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी योग दिन कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले. मैदानावर ४७५ विद्यार्थ्यांच्या मदतीने मानवी साखळी तयार करत फुटबॉल, योग दिन, खुली झालेली होर्मुज खाडी, व ऑलिव्ह फांदी घेवून उडणारे कबुतर याचे रेखाटन करत जगाला मैत्रीचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. योग दिन कार्यक्रमासाठी श्री विलास गायकवाड, संतोष वाकचौरें ,श्रीमती मनिषा शेळके, अर्चना नवले, वसंत बोडखे, संजय शिंदे, मच्छिंद्र पवार, उज्वला देवके , बाळासाहेब कुळधरण, ज्योती फुलसौंदर, बबन दळवी, खंडू नवले, बाबासाहेब गर्दे ,संजय सोनवणे, आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मौलिक प्रयत्न केले.

# सोनगावात महेश नवमी जल्लोषात



युवावार्ता (प्रतिनिधी)

चणेगाव - प्रवरा परिसरातील सोनगाव येथे प्रवरा परिसर तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चणेगाव व सोनगाव येथील राजस्थानी समाजाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यास प्रवरा परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महेश नवमी निमित्त भगवान महेश यांच्या प्रतिमेची आकर्षक सजवलेल्या रथातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेच्या अग्रभागी वाजंत्री पथकाने वातावरण भक्तिमय केले होते. महिला, पुरुष व युवक-युवतींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

यानंतर अमृतवाहिनी प्रवरा नदीकाठी धानोरे घाट येथे आनंद सोहळा साजरा करण्यात आला. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. श्रीराम मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला. महेश नवमी महोत्सवामुळे समाजामध्ये ऐक्य, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी परिश्रम घेतले.

# भारती विद्यापीठाच्या इंग्रजी परीक्षेत मालपाणी विद्यालयाची चमकदार कामगिरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भारती विद्यापीठाच्या इंग्रजी परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. विद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कनश्री श्रीपाल कटारिया हिने भारती विद्यापीठ डव्हान्सड इंग्रजी परीक्षेत ७७ / ८० गुण मिळवत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एप्रिल २०२६ मध्ये भारती विद्यापीठ इंग्रजी परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेत मालपाणी विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला असून विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवर यश संपादन केले आहे.

इयत्ता पाचवीच्या इंग्रजी प्री-प्रायमरी परीक्षेत शामल श्रीहरी फुलसुंदर हिने ९२ / १०० गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता सहावीच्या इंग्रजी प्रायमरी परीक्षेत स्वरा सचिन नाईकवाडी आणि श्रीनिधी महेंद्र वराडे या दोघींनी प्रत्येकी ९४ / १०० गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला.

इयत्ता सातवीच्या इंग्रजी एंट्रन्स परीक्षेत शिवम कृष्णा पंचारिया याने ९२ / १०० गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. इयत्ता आठवीच्या इंग्रजी प्री-इंटरमिजिएट परीक्षेत प्रेरणा सचिन भुतकर आणि श्रद्धा गणेश शिंदे या दोघींनी प्रत्येकी ८७ / १०० गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.

इयत्ता नववीच्या इंग्रजी इंटरमिजिएट परीक्षेत वेदा भागवत पोखरकर हिने ७३ / ८० गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयातील इंग्रजी विषयाच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनाची प्रचिती आली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय शिक्षक मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार, माधवी पाटील, शकुंतला खरात,अंबादास बुलाखे,अमोल सस्कर,अश्विनी चकोर, वैशाली कोल्हे आणि रूपाली जेजुरकर यांनी विशेष मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या नियमित सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश मिळाल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

# मोदी मंत्रिमंडळात फेरबदलाचे वारे...

पान १ वरून -

धर्मेंद्र प्रधान यांच्याबाबतही चर्चा

नीट परीक्षेतील वाद आणि विद्यार्थ्यांमधील नाराजीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही विरोधकांकडून टीका होत आहे. त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत असून, संभाव्य फेरबदलात त्यांचे खाते बदलले जाऊ शकते किंवा त्यांना मंत्रिमंडळातून वगळले जाऊ शकते, अशी राजकीय चर्चा सुरू आहे.

पश्चिम बंगालमधील अलीकडील निवडणुकांमध्ये भाजपला अपेक्षेपेक्षा चांगले यश मिळाल्यानंतर केंद्र सरकारमध्ये बंगालमधील नेत्यांना अधिक संधी देण्याबाबतही चर्चा सुरू आहे. यामुळे राज्यातील भाजपची संघटनात्मक ताकद वाढवण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

सूत्रांच्या माहितीनुसार हा फेरबदल केवळ कार्यकाळ संपल्यामुळे होत नसून, काही मंत्रालयांच्या कामगिरीबाबत केंद्र सरकार समाधानी नसल्याचे सांगितले जाते. पंतप्रधान मोदी यांनी ठरवून दिलेल्या विकास आणि प्रशासनाच्या प्राधान्यक्रमांनुसार अधिक प्रभावी कामकाज व्हावे, यासाठी काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा विचार सुरू आहे.

त्यामुळे आगामी काही दिवसांत केंद्राच्या मंत्रिमंडळात मोठे बदल होण्याची शक्यता असून, अनेक विद्यमान मंत्र्यांना डच्चू मिळू शकतो तर नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTAYOUTUBE CHANNEL

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
8999795056

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता –
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458






# मराठा विद्यार्थ्यांना ओबीसीप्रमाणे सवलतींची तात्काळ अंमलबजावणी करा - ना. विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसी प्रवर्गाप्रमाणे शैक्षणिक व इतर सवलती देण्याबाबत दिनांक ५ जून २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रमाणे संबंधित विभागांनी तात्काळ अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

विधान भवनात मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाशी संबंधित विविध प्रलंबित विषयांचा आढावा घेण्यात आला आणि झालेल्या निर्णयाप्रमाणे अमंलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस मंत्री मंडळातील जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, माहीती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मदत व पुनर्वसन मकरंद जाधव, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हास्तरावर मराठा समाजाच्या अडचणी आणि शंकांचे निरसन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरावर तातडीने हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात यावी, तालुका आणि जिल्हा स्तरावर प्राप्त होणारी निवेदने व मागण्यांचे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या थेट देखरेखी खाली वर्गीकरण करण्याची प्रक्रीया सुरू करावी. स्थानिक पातळीवरील मागण्यांचे तात्काळ निराकरण करण्यात यावे, तसेच ज्या मागण्या/निवेदने राज्य शासनाशी संबंधित आहेत, ती आवश्यकते नुसार तात्काळ शासनाकडे सादर करावीत, असा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत घेण्यात आला.

जिल्हा व तालुकास्तरीय तक्रार निवारण प्रक्रियेचा प्रत्येक आठवड्याला सविस्तर आढावा घेऊन कार्यवाही करावी आणि त्याबाबतचा प्रगती अहवाल दर आठवड्याला राज्य शासनास सादर करावा, असे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने प्रशासनाला दिले आहेत. राज्य सरकारने ५ जून २०२६ रोजीच्या काढलेल्या शासन निर्णयानुसार मराठा समाजातील किती विद्यार्थ्यांना आतापर्यंत या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे, याची सविस्तर आकडेवारी संबंधित विभागाने पुढील बैठकीत अनिवार्यपणे सादर करावी, असे निर्देश मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना दिले असून, मराठा आरक्षणाच्या उपसमितीची बैठक आता नियमितपणे घेतली जाणार आहे. चालू अधिवेशन कालावधी संपल्यानंतर, राज्य मंत्रिमंडळाच्या (कॅबिनेट) बैठकीनंतर या उपसमितीची बैठक घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

मराठा समाजाच्या विविध योजना आणि आरक्षणाशी संबंधित बाबींचा पाठपुरावा करण्यासाठी एक स्वतंत्र 'मराठा कक्ष' तात्काळ कार्यरत करण्यात यावा, असा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

न्यायमुर्ती शिंदे समितीच्या कामकाजाला गती देण्यासाठी त्यांना स्वतंत्र कार्यालयीन जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय तात्काळ घेण्यात यावा, अशा सूचनाही संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत

# कोतूळ संस्थेतील कथित गैरव्यवहार

## संचालक व कर्मचाऱ्यांकडून वसुलीचे आदेश- सहाय्यक निबंधक



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- तालुक्यातील कोतूळ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेतील १२ लाख ५ हजार ५०० रुपयांच्या कथित गैरव्यवहाराची रक्कम संचालक व कर्मचाऱ्यांकडून आठ टक्के व्याजदराने वसूल करण्यात यावी, असे आदेश अकोलेचे सहाय्यक निबंधक यांनी दिले आहेत.

याबाबतची अधिक माहिती अशी, की कोतूळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सुमारे १२ लाख ५ हजार ५०० रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा ठपका प्राधिकृत चौकशी अधिकारी तथा सेवानिवृत्त विशेष लेखापरीक्षक वर्ग २ सहकारी संस्था अहिल्यानगरचे बाबासाहेब पगारे यांनी तपासणीत ठेवला आहे. सदर गैरव्यवहार रकमेस जबाबदार असणरि तत्कालीन सचिव दादाभाऊ साबळे, लिपीक रोहिदास जगताप, दीपक परशुरामी यांच्याकडून - प्रत्येकी ४ लाख १ हजार ८३३ रुपये असे एकूण १२ लाख ५ हजार ५०० रुपये तसेच चौकशी फी जबाबदारीची रक्कम प्रत्येकी ५ हजार ६०० रुपये

संस्थेचे अध्यक्ष विशाल गोडे, उपाध्यक्ष निवृत्ती पोखरकर, संचालक मनोज देशमुख, सयार्थी देशमुख, रघुनाथ जाधव, गेनू गोडे, संदीप लेंडे, बाळासाहेब लेंभे, भाणा शेळके, चंदन वायळ, भीमराव साळवे, बाळासाहेब बेळे, उषा गौड, सुनंदा कांबळे, चंदू पवार, सचिव दादाभाऊ साबळे, लिपीक रोहिदास जगताप, दीपक परशुरामी यांचेकडून एकूण १ लाख ८०० रुपये रक्कम २५ सप्टेंबर, २०२५ पासून आठ टक्के सरळ व्याजाने वसूल करण्यात यावे असे आदेश सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी दिले आहे. सदर रकमेची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून रक्कम भरणा केली किंवा माही याचा अहवाल पंधरा दिवसांत सादर करावा असा आदेश दिला आहे. जबाबदारीची रक्कम १२,०५,५०० आणि चौकशीची जबाबदारी रक्कम १,००,८०० अशी एकूण १३,०६,३०० रुपये संचालक व कर्मचाऱ्यांकडून ८ टक्के सरळ व्याजाने वसूल करण्यात यावे. पंधरा दिवसांत सदर रक्कम वसूल झाली किंवा नाही याबाबतचा अहवाल पंधरा दिवसांच्या आत सादर करावा असेही सहाय्यक निबंधक यांनी म्हटले आहे.

# अमृतवाहिनी पॉलिटेक्निकच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यामध्ये उच्च व तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये अग्रमानांकित असलेल्या अमृतवाहिनी शिक्षण संस्थेतील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६ च्या अंतिम परीक्षेत सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले असून ८३ विद्यार्थ्यांना विविध विषयात शंभर पैकी १०० गुण मिळवले असून यावर्षीही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती प्राचार्य प्रा. व्ही.बी धुमाळ यांनी दिली आहे.


एमएसबीटीई परीक्षा २०२६ मध्ये अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी तंत्रनिकेतन मधील विविध विभागांच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. याचबरोबर ८३ विद्यार्थ्यांनी विविध विषयांमध्ये शंभर पैकी १०० गुण मिळवले आहेत. उत्कृष्ट गुणवत्ता व उ निकाल याचबरोबर अमृतवाहिनी संस्थेचा विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर सामंजस्य करार आहे यामुळे विविध कंपनी महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांच्या कॅम्पस इंटरव्यू घेत असतात यावर्षी ६२४ विद्यार्थ्यांना चांगल्या पॅकेजवर थेट नोकरीच्या संधी मिळाली आहेत. सातत्याने विविध कंपन्यांमधून होत असलेल्या प्लेसमेंट मुळे विद्यार्थ्यांना करिअर साठी ही मोठी संधी आहे.

यावर्षीच्या निकालात स्थापत्य अभियांत्रिकी विभाग ( Civil Engineering ) द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. निखिल दत्तात्रय भरितकर - ९०.८०%, २. दिव्या प्रफुल्ल कडलग - ८८.८०%, ३. सिद्धी सोमनाथ देशमुख - ८७.७१%, ४. रोहित बालू बरगळ - ८७.०९%, ५. आदित्य विरेंद्र परदेशी - ८६.१७%, तृतीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. कृष्णराज सुरेश मंडलिक - ९५.२८%, २. सर्वेश संजय गायकवाड - ९२.६१%, ३. अर्जुन अजित गुंजाळ - ९१.७८%, ४. वैभव प्रकाश पवार - ८९.९४%, ५. तन्वी अनिल कांदळकर - ८८.६७%, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी विभाग ( Computer Technology ) द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. यशराज राजेश गोडसे - ९४.४१% , २. पूजा किरण आंबरे - ९३.८२% , ३. ईशान जयंत मनसुके - ९३.७६% , ४. साधिचा दत्तू हासे - ९३.७१%, ५. जोया वकार शेख - ९३.३५%, तृतीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. प्रसाद बाबासाहेब गोसावी - ९७.०६%, २. कृष्णा गोविंद दहिफळे - ९६.७१% , ३. अनुजा संतोष कडलग - ९६.३५% , ४. सपना नारायण साबळे - ९६.१८% , ५. सिद्धेश रविंद्र भामरे - ९५.७१% , इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभाग (ETC) द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. ऋतुजा रामनाथ खतोडे - ९१.१७% , २. धनश्री संदीप फुलसुंदर - ८९.००%, ३. स्वामिनी सुधाकर शेजुळ - ८७.५६% , ४. अनुष्का तुषार अत्तरदे - ८५.७२%, ५. समीक्षा कैलास कासार - ८५.५०%, तृतीय वर्ष टॉपर विद्यार्थी, १. सुयश भाऊसाहेब बोंबले - ९५.६०% , २. श्रृष्टी अरुण कोटकर - ९३.७१% , ३. अनुष्का मच्छिंद्र खैरे - ९३.३७%, ४. मयुरी अनिल कानवडे - ९३.२०% , ५. ओम योगेश कडलग - ९२.०६%, माहिती तंत्रज्ञान विभाग (Information Technology ) द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. तनुजा विठ्ठल आढाव - ९५.७१% , २. शिफापरवीन असगरअली अन्सारी - ९५.३५%, ३. आदित्य किरण कापले - ९४.७६% , ४. अमेय सुरेश कासार - ९४.५९% , ५. प्रेम रविंद्र गुंजाळ - ९४.०६% , तृतीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. गायत्री सोमनाथ भागवत - ९२.००% , २. वैष्णवी भाऊसाहेब सातपुते - ९१.२९% , ३. गुंजन महेश देशमुख - ८९.८२% , ४. सुप्रिया बाबासाहेब पवार - ८९.३५% , ५. वैभवी रामदास धनवडे - ८८.८८%, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग ( Mechanical Engineering ) द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. रुशी भीमाशंकर दुबे - ८९.८३% . २. अक्षदा दत्तात्रय रेवगडे - ८५.०५% , ३. साहिल नंदू बोडके - ८४.६१% , ४. पूजा सुभाष चंद्रे - ८४.४४%, ५. रोहन मधुकर म्हसे - ८३.७७% , तृतीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. ओम लक्ष्मण काकड - ९०.८९%, २. अभिजीत सोन्याबापू इनोर - ८९.५६% , ३. सृष्टी हरीश देशमुख - ८९.११% , ४. निलम रविंद्र गुंजाळ - ८८.७८% , ५. वरद विजयकुमार जाधव - ८७.२२%, मेकॅट्रॉनिक्स विभाग (Mechatronics Engineering) द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. साक्षी संभाजी कुटे - ९०.३९% , २. प्रद्युम्न बाबासाहेब गायकवाड - ९०.३९% , ३. अस्मिता योगेश खांडगे - ९०.११% , ४. योगेश संजय गुळवे - ८६.८९% , ५. नम्रता नवनाथ इलग - ८६.४४% , ६. विद्या नामदेव वाघ - ८६.२८% , तृतीय वर्ष टॉपर विद्यार्थी १. राऊत रोहन दीपक - ९१.१७% , २. काळे अजिंक्य लक्ष्मण - ९०.७२% , ३. शेख जुनेरा अनिस - ८९.५६% , ४. वाकचौरे चैतन्य मनोज - ८९.११% , ५. यादव यश राजेश - ८७.८९% या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. याचबरोबर एकूण ८३ विद्यार्थ्यांना विविध विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.

# विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांकडून मराठीची हेळसांड

## राज ठाकरेंकडून विधानसभा अध्यक्षांची चिरफाड

**विधीमंडळ अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत राज्यातील नामवंत, किर्तीवंत दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली वाहतांना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका आशाताई भोसले यांना श्रद्धांजली वाहतांना मराठीतून ज्या पद्धतीने वाचन केले ते पाहता अध्यक्षांची मराठी भाषा कशी आहे आणि हे सरकार मराठी भाषेचे कसे सवंर्धन करणार असा प्रश्न निर्माण होत आहे. त्यावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केलेले प्रखर भाष्य पुढील प्रमाणे ...**




पद्मविभूषण आशाताई भोसलेंच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडताना, विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांनी ज्या पद्धतीने मराठी भाषेची चिरफाड केली आणि कागदावर लिहून दिलेलं मराठी पण त्यांना वाचता येत नाही हे पाहून संताप, उद्वेग दोन्ही दाटून आला. वाचण्या आधी त्या कागदातून भेळ खाल्ली होती का यांनी ? नार्वेकरांनी हा प्रस्ताव स्वाहिली अथवा हिब्रू भाषेत मांडला असता तरी चाललं असता कारण त्यांचं मराठी पण कळलं नाही आणि स्वाहिली, हिब्रू तसं पण कोणालाच कळत नाही. बरं अजून एक शोकांतिका म्हणजे नार्वेकर, दीनानाथ मंगेशकरांचा उल्लेख दीनदयाल मंगेशकर करत होते आणि वाट्टेल तसं मराठी वाचून दाखवत होते त्यावेळेस सभागृहात उपस्थित एकाही आमदाराला आक्षेप नोंदवावासा वाटला नाही. नार्वेकरांना ना दीनानाथ मंगेशकर माहित आहेत ना दीनदयाळ उपाध्याय माहित आहेत.

भाजपने जी काही खोगीरभरती सुरु केली आहे त्यात त्यांची अवस्था तेलही गेलं, तूपही गेलं, हाती आलं धुपाटणे अशी झाली आहे. सभागृहात नक्की कोण उपस्थित होतं माहित नाही पण अनेक ज्येष्ठ आमदार इथे असणार हे नक्की त्यांच्यापैकी एकानेही विरोध दर्शवला नाही ? सभागृहात श्री. देवेंद्र फडणवीस उपस्थित होते का माहित नाही, पण असते तरी मला वाटत नाही त्यांना काही फरक पडला असेल. गुलाबी आंखे जो तेरी देखी सारखी अनेक गाणी ( स्वतः निर्माण केलेल्या बेसुरात) म्हणणाऱ्या फडणवीसांना आज आपल्या राज्यात विधानसभेत कोणत्या महान व्यक्तीला आपण श्रद्धांजली अर्पण करणार आहोत आणि त्याचं गांभीर्य काय असतं हे समजायला हवं होतं ! पण त्यांच म्हणणं सोपं आहे, सांगितलेली फोडाफोडीची कामं होत आहेत ना बरोबर , अधिवेशनाचा उपचार पूर्ण होत आहे ना ? बस झालं. दीनदयाल मंगेशकर म्हणो की दीनानाथ चौहान म्हणो काय फरक पडतो. शोकप्रस्ताव पण एक उपचारच आहे जो पार पडला. महाराष्ट्रातील आधीच्या, आताच्या पिढ्या हे पाहात आहेत आणि हे रेकॉर्ड झालेले सभापतींचे भाषण पुढच्या पिढ्या पाहतील याचं भान आणि जाणीव दोन्हीही नाही ? माणूस शिक्षित असला पाहीजे पण त्यापेक्षा तो सुज्ञ असला पाहिजे याची जाणीव मुख्यमंत्री सभापतींना करून देणार आहेत का नाही ?

आणि श्री. एकनाथ शिंदेंना पण याच्याशी घेणंदेणं असण्याचं काहीच कारण नाही. मराठी भाषेबद्दलच्या अभ्यासाचं त्यांचं विमान पंन्नास हजार फुटावरून चाललंय म्हणून त्यांचा पण दूर दूर पर्यंत संबंध नाही ! ही अवस्था आहे आज आपल्या महाराष्ट्राची. महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षाला समोरच्या कागदावर लिहिलेलं मराठी वाचता येत नाही, ते सभागृह मराठी भाषेविषयी काय आस्था बाळगणार किंवा मराठीची गळचेपी होत आहे म्हणून काय कारवाई करणार ?

या सभागृहाला अध्यक्ष म्हणून गणेश वासुदेव माळवणकर लाभले जे पुढे लोकसभेचे पहिले अध्यक्ष झाले. नार्वेकर ज्या अलिबागमधून येतात त्या अलिबागचे दत्तात्रय काशिनाथ कुंटे विधानसभेचे अध्यक्ष होते, अरुणभाई गुजराथी होते, बाळासाहेब भारदे होते, अगदी आत्ता आता अध्यक्ष असलेले दिलीप वळसे पाटील होते. अशी अध्यक्षांची परंपरा कुठे आणि सध्याची काय ही अवस्था ? कधीकधी विधिमंडळाच्या कामकाजाचं चित्रण समोर येतं ते ऐकावंसं आणि बघावंसं पण वाटत नाही इतकं सुमार पद्धतीने सुरु आहे. आपल्या भाषेची गळचेपी ही हिंदी लादून केंद्राकडून सुरु आहे, ती राज्यात येणाऱ्या परप्रांतीयांकडून सुरु आहे आणि राज्याच्या विधिमंडळाकडून पण सुरु आहे याचं सगळ्यात जास्त वाईट वाटतं, चीड येते. काल नार्वेकरांनी आशाताईंच्या निधनाचा नाही तर मराठी भाषेच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडला आणि त्यावर एकाही सदस्याने ब्र देखील न काढून या शोकप्रस्तावाला जणू संमतीच दिली. मराठी माणसाने विचार करावा की काय पद्धतीची माणसं आणि सरकार आपण निवडून देत आहोत.

महाराष्ट्राच्या विधानसभेत मराठी भाषेला रस्त्यावर सांडून नार्वेकरांनी त्यावर आपला बेजबाबदार बुलडोझर फिरवल्याबद्दल आणि शब्दशः धिंडवडे काढणाऱ्या या वृत्तीचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे निषेध !

**– राज ठाकरे**

### माझ्याकडून चूक घडली - नार्वेकर

**सर्वांसारखा मराठीचा अभिमान मलाही आहे. वाचन करताना माझ्याकडून चूक घडली. घडलेल्या घटनेबाबत दिलगिरी व्यक्त करतो. प्रिंट अस्पष्ट होती, फॉन्ट लहान होता असं स्पष्टीकरण राहुल नार्वेकर यांनी दिले आहे.**

# आश्वी परिसरातील वीज समस्येवर शेतकरी आक्रमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - तालुक्यातील आश्वी परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी आणि नागरिक हैराण झाले आहेत. वारंवार विनंत्या करूनही महावितरणने दाद न दिल्याने, आता जनतेचा, संयम सुटला असून, वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास बुधवार दि. १ जुलै, २०२६ रोजी मांचीहिल फाट्यावर 'रास्ता रोको' आंदोलनाचा इशारा माजी पंचायत समिती सदस्य सरुनाथ उंबरकर यांनी दिला आहे.

शेतीसाठी सहा तास वीजपुरवठा मिळणे अपेक्षित आहे, मात्र आश्वी भागात वीज पूर्ण दाबाने मिळत नाही. तांत्रिक बिघाडामुळे वीज गेल्यास ती तासंतास येत नाही. या गंभीर समस्येबाबत मंत्री विखे पाटील यांच्या कार्यालयात महावितरणबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत. इतकेच नव्हे, तर पालकमंत्र्यांकडेही तीन-चार वेळा गाऱ्हाणे मांडले आहे. सूचना मिळूनहीं वीज वितरण कंपनीने या तक्रारींकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचा आरोप उंबरकर यांनी केला आहे. शेतीला रात्री वीज पुरवठा केला जात असल्याने बिबट्याच्या दहशतीमुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण कुटुंब काळजीपोटी रात्र जागून काढत आहे. त्यामुळे बाभळेश्वर ते आश्वी या मुख्य वाहिनीसह उपकेंद्राचे तातडीने नूतनीकरण केल्याशिवाय या समस्येचा कायमस्वरूपी तोडगा निघणार नाही, असे स्पष्ट मत सरुनाथ उंबरकर यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणाले, वीज कंपनीने पुढील चार-पाच दिवसांत शेतीला ८ तास पूर्ण दाबाने आणि गावठाणाला २४ तास अखंडित वीज पुरवठा करण्याचे नियोजन केले नाही, तर १ जुलैला मांचीहिल फाट्यावर तीव्र रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा देखील दिला आहे. दरम्यान, जून महिना संपत आला तरी, पावसाला म्हणावी अशी सुरुवात झालेली नाही. त्यामुळे अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनी आणि नागरीकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे आता वीज कंपनी आणि शेतकऱ्यांमध्ये संघर्ष तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आश्वी परिसरातील गाव्रात केवळ पाच-दहा मिनिटांचा सोसाटयाचा वारा किंवा पावसाच्या हलक्या सरींनीही वीज गायब होते. अनेकदा तास-तास तर, कधी २४ ते ४८ क्रास वीजपुरवठा सुरळीत होत नाही, याबाबत माहिती घेतली असता, उपकेंद्राची बहुतांश यंत्रणा, वीज पोल आणि विद्युत वाहक तारा अत्यंत जुन्या व जीर्ण झाल्या आहेत. यामुळे वारंवार फॉल्ट होत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे भविष्याच्या दृष्टीने तातडीने या सर्व जीर्ण यंत्रणेचे पुनर्निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


मा. श्री. संजय राठी
प्रसिद्ध लेखापाल (सी.ए.)


डॉ. शिवराज कोडे
प्रतिथयश नेत्ररोग तज्ज्ञ


मा. श्री. अक्षय आहेर
संचालक, सारथी कॉम्प्युटर


मा. श्री. मारूती मेंगाळ
अकोले पंचायत समितीचे माजी उपसभापती, अकोले


मा. श्री. सुर्यकांत शिंदे सर
ज्येष्ठ रंगकर्मी

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ढा डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



# दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





भंडारी
“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर , संगमनेर


# पुणे-नाशिक रेल्वे मार्गासाठी निर्णायक लढा

## अन्यायाविरोधात जनआंदोलन तीव्र होणार




युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाच्या नावाखाली सुरू असलेली सरकारी टोलवाटोलवी, निधीचा गैरवापर आणि मूळ सरळ मार्गाला दिलेला बगलमार्ग आता जनतेला मान्य नाही. रेल्वे मार्ग राजगुरूनगर, चाकण, जुन्नर, संगमनेर, सिन्नर मार्गेच व्हावा, ही जनतेची रास्त आणि ठाम मागणी असून यासाठी आता व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला नाशिक-सिन्नर-संगमनेर-जुन्नर-पुणे रेल्वे मार्ग अनेक दशकांपासून शेतकरी, व्यापारी, उद्योग क्षेत्र आणि सर्वसामान्य नागरिकांची प्रमुख मागणी राहिली आहे. या मार्गाला मंजुरी मिळाली, काही ठिकाणी भूसंपादनाची प्रक्रिया देखील पार पडली; मात्र नंतर विविध तांत्रिक कारणांचे ढाल पुढे करून मूळ मार्गाला वळसा घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा जनतेच्या हक्कांवर घाला असून तो कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.

या पार्श्वभूमीवर ‘पुणे-नाशिक रेल्वे कृती समिती’ पुन्हा एकदा सक्रिय झाली असून सरळ रेल्वे मार्गासाठीचा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा केवळ रेल्वे मार्गाचा प्रश्न नसून भावी पिढ्यांच्या विकासाचा, शेतकऱ्यांच्या प्रगतीचा, रोजगारनिर्मितीचा आणि संपूर्ण परिसराच्या आर्थिक उन्नतीचा प्रश्न आहे. आमच्या हक्काची रेल्वे आम्हाला मिळालीच पाहिजे या निर्धाराने आता पाचही तालुक्यांतील नागरिकांनी एकजुटीने पुढे येण्याची गरज आहे. जनतेच्या एकत्रित शक्तीसमोर कोणताही अन्याय टिकू शकत नाही.

याच पार्श्वभूमीवर रविवार, दि. २८ जून रोजी सकाळी ११ वाजता घारगाव येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात भव्य जनसभा व नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे. रेल्वे मार्गासाठी लढणाऱ्या प्रत्येक नागरिकाने, शेतकऱ्याने, युवकांनी, व्यापाऱ्यांनी आणि सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हा लढा केवळ रेल्वेचा नाही, तर आपल्या अस्तित्वाचा, विकासाचा आणि स्वाभिमानाचा आहे.

# अहिल्यानगरमध्ये दारुगोळा, स्फोटके, संरक्षण साहित्य, सौर ऊर्जा प्रकल्प

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील हरेगाव मळा येथील ४ हजार २०० एकर जागा दारुगोळा, स्फोटके, संरक्षण साहित्य सौरऊर्जा प्रकल्प या तीन उद्योगांसाठी मंजूर करण्यात आली आहे. शेती महामंडळाची ही जमीन या उद्योगांना देण्यास महसूल विभागाने मंगळवारी मान्यता दिली.

दारुगोळा व स्फोटके संशोधन आणि विकास सुविधा निर्माण करण्यासाठी डीआरडीओला १ हजार ५०० एकर, सौरपार्क व पवनऊर्जा प्रकल्पासाठी महाऊर्जाला १२०० एकर तसेच संरक्षण साहित्य निर्मिती प्रकल्पासाठी निबे ऑर्डन्स अँण्ड मेरी टाईम फॅक्टीरीज लिमिटेडला १ हजार ५०० एकर अशी ४ हजार २०० एकर जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात मंगळवारी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. बैठकीला शिक्षणमंत्री दादा भुसे आणि पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थित होत्या.या संस्थांना ही जमीन ४९ वर्षांच्या भाडेकरारावर देण्यात येणार आहे. यासाठी प्रति एकर ५० हजार रुपये वार्षिक भाडे निश्चित करण्यात आले असून, तीन वर्षांचे भाडे एकाच वेळी भरावे लागणार आहे. या संस्थांना जमीन दिल्यानंतर शेती महामंडळाकडे शिल्लक राहणारी २ हजार ३०० एकर आणि अन्य १ हजार ६०० एकर अशी एकूण ३ हजार ९०० एकर अकारी पड जमीन परिसरातील शेतकऱ्यांना वाटप करण्याचा निर्णयही घेतला आहे.

या निर्णयाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी राज्य मंत्रिमंडळाच्या अंतिम मंजुरी घ्यावी लागेल. त्यानंतर वाटपाची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे उपसमितीने स्पष्ट केले.

# अकोलेत पुन्हा अल्पवयीन मातृत्वाची धक्कादायक घटना

## कुमारी मातेने दिला बाळाला जन्म

युवावार्ता(प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि त्यातून उद्भवणाऱ्या अल्पवयीन मातृत्वाच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. मागील वर्षी ५५ अल्पवयीन मातांच्या नोंदींची चौकशी सुरू असतानाच आता कोतुळ येथे एका अल्पवयीन मुलीने मुलाला जन्म दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामुळे तालुक्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील एका गावातील १८ वर्षांपेक्षा कमी वयाची गर्भवती मुलगी पोटदुखीच्या तक्रारीमुळे कोतुळ येथील एका खासगी रुग्णालयात दाखल झाली होती. उपचारादरम्यान ती रुग्णालयातील बाथरूममध्ये गेली असता तिने तेथेच एका मुलाला जन्म दिला. प्रसूतीनंतर डॉक्टरांनी चौकशी केली असता संबंधित मुलीचे लग्न झाले नसल्याचे समोर आले.

पुढील चौकशीत मुलीने बाळाच्या वडिलांचे नाव तालुक्यातीलच एका गावातील ३२ वर्षीय व्यक्ती असल्याचे सांगितले. मुलगी अल्पवयीन असताना तिची गर्भधारणा झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित डॉक्टरांनी अकोले पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) अंतर्गत गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे. जन्माला आलेले बालक सध्या नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात (सिव्हिल हॉस्पिटल) सुरक्षित असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, अकोले तालुक्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने सामाजिक आणि प्रशासकीय स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे. नुकतेच करंडी व देवठाण परिसरातही अल्पवयीन मुलींवरील अत्याचारप्रकरणी पोक्सो अंतर्गत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत. अशा घटनांमुळे मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून कठोर कारवाईची मागणी नागरिकांतून होत आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हजारे करीत आहेत.


नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# 'लाडकी बहिण योजना ' बोगस लाभार्थ्यांकडून होणार वसूली

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’ला सरकारी अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तसेच गैरप्रकारामुळे मोठा फटका बसला. या योजनेत तब्बल १३,४१५ शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी नियमबाह्य आणि बेकायदेशीरपणे लाभ घेतल्याचे राज्य सरकारने अधिकृतपणे मान्य केले आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित झालेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही धक्कादायक माहिती लेखी स्वरूपात सादर केली आहे.

विधानसभेत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, या योजनेतील गैरप्रकाराची व्याप्ती मोठी आहे. योजनेचे नियम धाब्यावर बसवून अपात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांनी मिळून शासनाच्या तिजोरीतून तब्बल १६५ कोटी रुपयांचा लाभ लाटल्याचा गंभीर मुद्दा विधानसभेत गाजला. धक्कादायक बाब म्हणजे, केवळ महिलांसाठी असलेल्या या योजनेत अनेक ’पुरुष लाभार्थी’ देखील आढळले आहेत. पुरुषांच्या नावाने अर्ज मंजूर होऊन त्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचे उघडकीस आले आहे.

घोटाळा समोर आल्यानंतर सरकारने तात्काळ पावले उचलत कडक कारवाई सुरू केली आहे. योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व पुरुष लाभार्थ्यांचे आणि पडताळणीत अपात्र ठरलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे बँकेत जाणारे हप्ते तात्काळ प्रभावाने बंद करण्यात आले आहेत. नियमबाह्यपणे बँक खात्यात जमा झालेली रक्कम परत मिळवण्यासाठी संबंधित शासकीय विभाग आणि सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13








चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
- हृदयरोग (Heart Diseases)
- मेंदूरोग (Brain Diseases)
- कर्करोग शस्त्रक्रिया
- अपघात (Accident)
- लहान बालकांची शस्त्रक्रिया
- गुडघ्याचे प्रत्यारोपण
- विद्युत अपघात रुग्ण
- कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
- डायलिसिस
- अपघात शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्यारोपण
- मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर



स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25